अॅग्रोवन



किनवट, जि. नांदेड : येथील जिल्हा कृषी महोत्सवाचे उद्‍घाटन आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते झाले. या वेळी भाऊसाहेब बऱ्हाटे, राजकुमार रणवीर, बालाजी मुंडे आदी.

# तृणधान्य लागवड करून उन्नती साधावी : आमदार केराम

## किनवट येथे जिल्हा कृषी मेळाव्याचे आयोजन

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

नांदेड : शेतकऱ्यांनी तृणधान्याची लागवड करुन आरोग्यासह आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहन आमदार भिमराव केराम यांनी केले.

किनवट येथे कृषी विभागाच्या मार्फत राष्ट्रीय अन्नसुरक्षा व पौष्टिक तन्नधान्य योजनेअंतर्गत जिल्हा कृषी मेळाव्याचे आयोजन केले होते. या वेळी आमदार केराम बोलत होते. कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कृषी शास्त्रज्ञ श्री. जावळे, पोखर्णी कृषी विद्यापीठ केंद्राचे डॉ. देविकांत देशमुख, उपविभागीय कृषी अधिकारी राजकुमार रणवीर, किनवटचे नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी मुरकुटे, माजी उपनगराध्यक्ष अनिल तिरमनवार, तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे आदी उपस्थित होते. डॉ. देविकांत देशमुख यांनी फास्टफूडमुळे मानवी जीवनावर होणारे याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. जवळे यांनी पिकांच्या विविध जाती, वाण व विद्यापीठातील संशोधन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रदर्शनात सहा तालुक्यांतील तृणधान्यापासून बनवलेले पदार्थ फळबाग रोपे व कलमे. सेंद्रिय पदार्थ, पीएमएफएमई अंतर्गत प्रक्रिया केलेले पदार्थ तसेच महिला बचत गटाचे गृह उद्योगाचे पदार्थ, तुषार व ठिबक सिंचन व विविध कृषी साहित्याचे ४० पेक्षा अधिक स्टॉल लावण्यात आले होते.